# कोकण मर्कंटाईल को-ऑप. बँक लिमिटेड मल्टिस्टेट बँक

१९७३ पासून

नोंदणीकृत कार्यालय : १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी, मुंबई - ४०००१०. दूरध्वनी : २३७२३७५३, २३७२९९६९, २३७२९९७०, २३७२९९७१, २३७३४२०२, २३७३४३११., फॅक्स : २३७४८५८९, वेब : www.kokanbank.net

## विक्री सूचना

प्राधिकृत अधिकारी यांचेकडून सर्वसामान्य जनता आणि विशेषकरून कर्जदार, भागीदार आणि जामीनदार यांना याद्वारे सूचना देण्यांत येते की, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या तरतुदींन्वये २८.०१.२०२५ रोजी प्रत्यक्ष कब्जात घेतलेल्या कोकण मर्कंटाईल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड कडे गहाण असलेल्या खालील मिळकती खालील तपशिलांनुसार मे. युएम मरीन एजन्सी एलएलपी चे कर्ज खाते क्र. **७०३१/५** प्रती रु. ६८,४७,८०३.७५/- (रुपये अडुसष्ट लाख सत्तेचाळीस हजार आठशे तीन आणि पंच्याहत्तर पैसे मात्र), या रकमेचे तारण कर्ज द.सा. १३% दराने पुढील व्याज यांच्या वसुलीसाठी खालील प्रमाणे निविदा-नि-जाहीर लिलावाने विकल्या जाणार आहेत :

फर्निचर आणि फिक्सचर्स शिवाय ''जसे आहे जेथे आहे आणि जसे आहे जे आहे'' तत्व/शर्तीवर मिळकती विकल्या जातील.

| अ. क्र. | नाव | मिळकतीचे वर्णन | मिळकती ची स्थिती | राखीव किंमत | इ.अ.र. (रु.) | निरीक्षणाची तारीख आणि वेळ | विक्रीची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| <br><br><br>१.<br><br>२.<br><br>३.<br><br>४.<br><br>५.<br><br>६.<br><br>७. | **कर्ज खाते क्र. ७०३१/५**<br>**कुर्ला शाखा**<br>मे. युएम मरीन एजन्सी एलएलपी -कर्जदार<br>श्री कार्लेकर मुनीर इस्माईल - भागीदार आणि हमीदार<br>मुहंमद सोहेल मुनीर कार्लेकर - भागीदार आणि हमीदार<br>श्री काई कप महेंद्र भिकू - हमीदार<br>श्री.कार्लेकर मुजफ्फर मुख्तार - हमीदार<br>सौ.कार्लेकर सईदा मुनीर - हमीदार<br>सौ. कार्लेकर समरीन सहल - हमीदार | मौजे कुर्ला -II मुंबई उपनगर जिल्हाचा सर्व्हे क्र.१७१ ते १७४ आणि २६० ते २६३ (सीटीएस क्र ९२२) धारक मिळकतीवरील एम.आय.जी. कॉलनी, विनोभा भावे नगर, कुर्ला (प.), मुंबई - ४०००७० येथे स्थित कुर्ला एम.आय.जी.संगम सीएचएस लिमिटेड अशा ज्ञात सोसायटीच्या इमारत क्र.३ मधील तळ मजल्यावरील मोज. अंदाजे ६७ चौ.मी. बिल्ट अप क्षेत्र फ्लॅट क्र.२. | बँकेसह प्रत्यक्ष कब्जात<br><br>बँकेसह प्रत्यक्ष कब्जात | रु. ९७,५०,०००/- | रु. ९,७५,०००/- | १८.०३.२०२५ स. ११. ते दु. ४.०० | २५.०३.२०२५ स. ११.०० |

इच्छुक खरेदीदार मिळकतीचे निरीक्षण वर दिलेल्या तारीख आणि वेळी करू शकतील.

येथील वरील विनिर्दिष्टीत स्थावर तारण मिळकतींच्या संबंधातील तपशील निम्नस्वाक्षरीकारांच्या सर्वोत्तम माहिती आणि समजुतीप्रमाणे नमूद केले आहेत तथापी ते सदर तपशिलांमधील कोणत्याही त्रुटी, गैर विधाने किंवा उणिवांसाठी जबाबदार नसतील.

जाहीर लिलावाच्या अटी आणि शर्ती :-

१) विक्री काटेकोरपणे येथे खाली वर्णन केलेल्या अटी आणि शर्तींच्या अधीन होईल.

२) मिळकतींची विक्री फर्निचर आणि फिक्सचर शिवाय **''जसे आहे जेथे आहे'' आणि ''जसे आहे जे आहे''** अटीवर होईल.

३) लिलावांतर्गत मिळकतींचे निरीक्षण वर विनिर्दिष्टीत केलेल्या तारीख आणि वेळेस करता येईल. मिळकतींचे निरीक्षण किंवा निविदा सादरीकरणासंबंधातील कोणत्याही चौकशांसाठी कृपया सिनियर मॅनेजर रिकव्हरी - कोकण मर्कंटाईल को-ऑप.बँक लि., १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी., मुंबई - ४०००१० **दूरध्वनी : ९८२०५४७७००/९८३३६५७९५५** येथे संपर्क साधावा.

४) इच्छुक खरेदीदार वरील मिळकतींसाठी त्यांचे प्रस्ताव एका मोहोरबंद पाकिटातून इसारा अनामत रक्कम (इ.अ.र) च्या डिमांड ड्राफ्ट सह **०७.०८.२०२४** रोजी किंवा त्यापूर्वी प्राधिकृत अधिकारी यांचे कार्यालय, कोकण मर्क-को-ऑप. बँक लिमिटेड, १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव टी.टी. मुंबई - ४०००१० येथे पाठवावेत. मोहोरबंद पाकिटांना विक्रीच्या वेळी **२१.०३.२०२५ रोजी स. ११ वा.** प्राधिकृत अधिकारी १ ला मजला, हार्बर क्रेस्ट, माझगाव, मुंबई - ४०००१० येथे इच्छुक बोलीदार, कर्जदार, भागीदार आणि जामीनदार यांच्या उपस्थितीत उघडतील.

५) रितसर न भरलेले प्रस्ताव किंवा सशर्त प्रस्ताव किंवा इ.अ.र. न जोडलेले प्रस्ताव किंवा येथे विहित केलेल्या तारीख आणि वेळेनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत/वैध समजले जाणार नाही व त्यानुसार फेटाळले जातील. इसारा अनामत रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

६) प्रस्ताव दस्तावेजासोबत इच्छुक बोलीदारांनी **केवायसी दस्तावेजांची (पॅन कार्ड व पत्ता पुरावा)** एक प्रत देखील जोडावी.

७) कोणत्याही परिस्थितीत मिळकती राखीव किंमत खाली विकल्या जाणार नाहीत.

८) कोकण मर्क. को-ऑप. बँक लि., ह्या तारणी धनकोंनी बोली स्विकारल्या अधीन सर्वोच्च बोलीदार/प्रस्तावकर्त्यांना मिळकती विकल्या जातील. तथापि, आवश्यक असल्यास निम्नस्वाक्षरीकारांना आपापसांत बोली लावण्याचे निर्विवाद अधिकार आहेत, ते सदर जागी, तारखेस आणि वेळी होईल.

९) लिलाव/आपापसातील बोली सुद्धा त्याच ठिकाणी होईल तेव्हा इच्छुक बोलीदार हजर राहून त्यांचे प्रस्ताव थेट सादर करू आणि त्यांचे प्रस्ताव उंचावू शकतील.

**१०) सदर मिळकतीच्या संबंधातील सर्व देणी म्हणजेच पालिका कर, मेन्टेनन्स/सोसायटी चार्जेस, वीज आणि पाणीपट्टी किंवा सर्व थकबाकींसह अन्य कोणतीही देणी यशस्वी बोलीदार/खरेदीदारांनी प्रदान करावयाची आहेत.**

**११) विक्री संबंधात प्राधिकृत अधिकाऱ्यांनी प्रस्ताव स्विकारल्या पासून २ कामाच्या दिवसांत तावडतोब २५% खरेदी रक्कम (आधी प्रदान केलेली इ.अ.र. समायोजित करून) यशस्वी बोलीदार/खरेदीदार यांना प्रदान करावी लागेल. कसुर केल्यास इसारा अनामत रक्कम जप्त होईल.**

**१२) उर्वरित ७५% विक्री किंमत, प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून यशस्वी अधिकाऱ्यांकडून यशस्वी खरेदीदारांना विक्री निश्चिती कळवण्याच्या १५ दिवसांत प्रदान केली पाहिजे. विहित मुदतीत उर्वरित ७५% विक्री किंमत किंवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे प्रदान करण्यांत कसुर झाल्यास, जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल आणि तारणी धनकों मिळकती पुन्हा विकण्यास मुक्त असतील आणि कसुरवार खरेदीदारांना मिळकती किंवा त्या खरेदी करण्यासाठी आधी प्रदान केलेल्या रकमेच्या कोणत्याही हिश्श्यावर कोणतेही दावे करता येणार नाहीत.**

१३) विक्री तारणी धनकोंच्या मंजुरी अधीन असेल.

१४) येथे वर वर्णन केलेल्या स्थावर मिळकती निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून विक्रीची निश्चिती झाल्याच्या तारखेपासून आग किंवा चोरी किंवा अन्य अपघात आणि इतर जोखीमांमुळे होणाऱ्या हानी किंवा नुकसानींसह सर्व बाबतीत सर्वस्वी यशस्वी खरेदीदारांच्या एकट्यांच्या जोखीमीवर असतील. यशस्वी बोलीदार कोणत्याही प्रकारच्या कोणत्याही आधारावर विक्री रद्द करण्यास हक्कदार नसतील.

१५) मिळकतींवरील कोणतीही वैधानिक आणि सोसायटीच्या देण्यांसह देय असलेली अन्य देणी खरेदीदारांना भरावी लागतील आणि उपरोक्त मिळकतींसाठी विक्री प्रमाणपत्रांच्या नोंदणी संबंधातील मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, हस्तांतरण आकार आणि अन्य कोणतेही परिव्यय व आकार यशस्वी बोलीदारांना भरावे लागतील.

१६) इच्छुक बोलीदार/प्रस्तावकर्ते स्वतः किंवा त्यांचे रितसर प्राधिकृत प्रतिनिधी यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तींना लिलाव विक्री प्रक्रियेत सहभागी होऊ दिले जाणार नाही.

१७) सदर सूचना ही सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या नियम आणि तरतुदींन्वये आयोजित केली जाईल.

**सरफैसी ॲक्ट, २००२ च्या नियम ८(६) अन्वये ३० दिवसांची वैधानिक विक्री सूचना**

कर्जदार, गहाणदार आणि हमीदार यांना याद्वारे आजपासून ३० दिवसांत आज पावेतो थकीत उपरोक्त रक्कम आणि अनुषंगिक परिव्यय प्रदान करण्याकरिता अधिसूचित केले जाते, कसुर केल्यास विक्रीस ठेवलेल्या मिळकती विक्री/विकल्या जातील आणि शिल्लक थकबाकी उरल्यास व्याज आणि खर्चासह वसुल केली जाईल.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १७.०२.२०२५**

**प्राधिकृत अधिकारी**
**सही/- कोकण मर्क. को-ऑप. बँक लि.**